ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख २० एप्रिल, १९५५ अंक १६

## विविध माहिती

**शेतांतील पिकांचे शत्रू**—उत्तर-प्रदेश सरकारनें पिकांचा व फळांचा नाश करणाऱ्या प्राण्यांत राज्यांतील पोपटांचेंहि नांव सामील केलें आहे. राज्याच्या शेतकी-खात्यानें अशा प्राण्यांची एक यादीच तयार केली आहे. यादींत पोपटांखेरीज माकडें व उंदीर ह्या प्राण्यांचीहि नांवें आहेत. उत्तर-प्रदेशांत पांच प्रकारचे पोपट सांपडतात. त्यांपैकीं एक विशेष धोकादायक आहे.

**अरबस्थानांतील टोळांची उत्पत्ति**—अरबस्थानांतील वालुकामय प्रदेशांत टोळांची उत्पत्ति मोठ्या प्रमाणावर होते. टोळांच्या उत्पत्तिस्थानावर विषारी द्रव्यांचा मारा करून त्यांचा नाश करण्यासाठी नऊ राष्ट्रांतील पथकें वाळवंटांत काम करीत आहेत. कामाची प्रगति कितपत झाली आहे तें तपासण्यासाठी संयुक्त-राष्ट्रसंघटनेच्या अन्नविभागाची एक खास कमिटी अरबस्थानांत जाणार आहे.

**कापसाची निर्यात करूं द्या**—अहमदाबाद जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष श्री. माणेकलाल शहा ह्यांनीं भारतीय सरकारकडे २ लाख गांसड्या कापूस निर्यात करण्याची परवानगी मागितली आहे. अहमदाबाद जिल्ह्यांत यंदा ४०,००० गांसड्या कापूस पिकेल असा अंदाज आहे. गेल्या सालीं ३०,००० गांसड्या कापूस पिकला होता. कापसाच्या किंमती उतरत चालल्यामुळें ही मागणी करण्यांत आली आहे.

**शिक्षकांसाठीं इमारत**—अहमदाबाद शहरांतील प्राथमिक शिक्षकांची राहण्याची सोय करण्यासाठीं २० लाख रुपयांचें कर्ज काढून इमारत बांधण्याचा विचार कॉर्पोरेशनतर्फे चालू आहे. शहरांतील २०१ शाळांच्या इमारतींपैकीं कॉर्पोरेशनच्या मालकीच्या सुमारें ५० इमारती आहेत.

**सौराष्ट्रांत नवे उद्योगधंदे**—सौराष्ट्रांत बरेच मोठे कारखाने काढण्याचा राज्य-सरकार विचार करीत असून त्यासंबंधींच्या योजनांचा सध्या काळजीपूर्वक अभ्यास करण्यांत येत आहे. तीन सिमेंटचे कारखाने, पांच भुइमुगाच्या तेलाच्या गिरण्या आणि एक मोठा सोडा ॲशचा कारखाना लवकरच काढण्यांत येणार आहेत. सोडा ॲशच्या कारखान्यासाठीं पोरबंदरची निवड करण्यांत आली आहे.

**भारतीय चित्रपट रशिआंत लोकप्रिय**—रशिआंत दाखविण्यांत आलेले भारतीय बोलपट तेथील लोकांना आवडल्यामुळें रशियाकडून आणखी हिंदी बोलपट मागविले जातील असा संभव आहे. रशिआंतील चित्रपटगृहांतून दाखविण्यांत येणाऱ्या चिनी बोलपटांची जागा भारतीय चित्रपटांनीं घेतल्याची वार्ता आहे. ‘राही’, ‘बूट पॉलिश’, ‘आवारा’, इत्यादि बोलपटांना रशिअन ध्वनिपट जोडण्यांत आलेले आहेत.

**शेतीच्या उत्पन्नावर कर**—म्हैसूर राज्याच्या विधिमंडळांत शेतीच्या उत्पन्नावर कर बसविणारें विधेयक प्रविष्ट करण्यांत आलें आहे. ह्या नवीन करामुळें राज्य-सरकारला २० लाख रुपयांचें वार्षिक उत्पन्न मिळेल असा अंदाज आहे. व्यापारी महत्त्वाच्या व नफा देणाऱ्या पिकांनाच बिल लागू करण्यांत येणार आहे.

**अहमदाबादचें रेल्वे-स्टेशन**—अहमदाबादच्या रेल्वे स्टेशनाची पुनर्घटना करण्याचें काम दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट करण्यांत येणार असल्याचें समजतें. अहमदाबादचें स्टेशन फार जुनें असून वाढलेल्या वाहतुकीच्या गरजा भागविण्यास अपुरें पडत आहे. पुनर्घटनेच्या कामासाठीं सुमारें ४० लाख रुपये लागतील.

**ब्रश तयार करण्याचा धंदा**—मद्रास सरकारनें तिरुवेलवेली जिल्ह्यांत दोन ठिकाणीं ब्रशेस तयार करण्याचा धंदा ग्रामोद्योगाच्या पद्धतीवर चालविण्याचें ठरविलें आहे. ताडीच्या झाडापासून ब्रश तयार करण्यासाठीं लागणारे तंतु मिळतात. परंतु सध्या हा कच्चा माल अमेरिकेला निर्यात करण्यांत येतो. त्याची निर्यात कमी करून ग्रामीण भागांतील लोकांना रोजगार देण्यासाठीं हा उपक्रम करण्यांत येत आहे.

**शैक्षणिक वस्तुसंग्रहालय**—भारतामधील पहिलें शिक्षण-विषयक वस्तुसंग्रहालय अमरेली येथें उघडण्यांत आलें आहे. संग्रहालय मुलांच्या उपयोगासाठीं काढण्यांत आलें आहे. त्यासाठीं एकूण १ लाख रुपये खर्च आला. ७०,००० रुपये अमरेली गांवच्या लोकांनीं जमविले. बडोदें संस्थानच्या मालकीचा रंगमहाल नांवाचा प्रशस्त प्रासाद मुंबई सरकारनें संग्रहालयासाठीं फुकट दिला.

**कामगारांच्या मालकीचा कारखाना**— तिरुवेलवेली येथील कारखानदार श्री. अरुणाचलम् पिले ह्यांनीं कापसाचे गठ्ठे बांधण्याचा कारखाना काढण्यासाठीं कामगारांना भांडवल देण्याचें ठरविलें आहे. भांडवल ५०० कामगारांत वाटून देण्यांत येणार आहे. हे कामगार-मालक गिरणीचा नफा आपसांत वांटून घेतील आणि श्री. पिले ह्यांचें भांडवल हप्त्याहप्त्यानें परत करतील.

**पाण्याच्या नळांचा कारखाना**—हिंदुस्थान आणि नॉर्वे ह्यांच्यांत झालेल्या मदतीच्या कराराप्रमाणें त्रावणकोर-कोचीन राज्यांत पाण्याचे नळ तयार करण्याचा कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखाना उभारण्यासाठीं नॉर्वेहून एक एंजिनिअर आला असून लवकरच जरूर ती यंत्रसामुग्रीहि त्या देशांतून भारतांत येईल.

### दोन स्कॉटिश बँकांचें एकत्रीकरण

१ मार्च रोजीं बँक ऑफ स्कॉटलंड व युनियन बँक ऑफ स्कॉटलंड ह्यांचें एकत्रीकरण पुरें झालें व युनियन बँक ही बँक ऑफ स्कॉटलंडमध्यें विलीन झाली. बँक ऑफ स्कॉटलंडकडे युनियन-बँकेच्या भांडवलाची मालकी गेली.

बँक ऑफ स्कॉटलंडची स्थापना १६९५ मध्यें झाली; मूळ नांवानें अखंड चालू असलेली, जगांतील जुन्या बँकांपैकी ती एक बँक आहे. आतांच्या एकत्रीकरणानंतरहि तिचें मूळ नांव व घटना कायम राखण्यांत आलेली आहेत.

युनियन बँकेची स्थापना १८३० सालाची आहे. तिचें मूळ नांव ग्लॅसगो युनियन बँकिंग कंपनी असें होतें.

एकत्रीकरणाच्या निमित्तानें बँक ऑफ स्कॉटलंडनें नव्या धर्तीची एक पौंडी नोट काढली आहे. अर्थात्, दोन्ही बँकांच्या चालू नोटा व्यवहारांत रहातीलच.

यूनियन बँकेच्या चेकफॉर्म्सवर लिहिलेले चेक, बँक ऑफ स्कॉटलंडवर काढलेले आहेत असें समजलें जाईल व त्याप्रमाणें त्यांची व्यवस्था केली जाईल.

---

### जागतिक बँकेनें १% कमिशन चालू ठेवावें काय ?

जागतिक बँक (इंटरनॅशनल बँक फॉर रीकन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंट) आपल्या कर्जावर १% कमिशन आकारते. बँकेच्या घटनेप्रमाणें, पहिलीं दहा वर्षें हें कमिशन आकारलेंच पाहिजे. ही मुदत जून, १९५६ मध्यें संपते; त्यानंतर हें कमिशन घ्याव-याचें किंवा नाहीं व घेतलेंच तर कोणत्या दरानें घ्यावयाचें, हें ठरविण्याचा अधिकार बँकेच्या व्यवस्थापकांना दिलेला आहे. बँकेच्या सभासदांपैकीं बहुतेक सभासद स्वत: बँकेचे कर्जदार असल्यानें, हें कमिशन ह्यापुढें घेण्यांत येऊं नये अशी जोराची मागणी केली जाण्याचा संभव आहे. बँकेचे रिझर्व्हज आणखी मजबूत केले पाहिजेत असें बाकीचे सभासद म्हणतील व त्यां-पैकीं अमेरिकेच्या मतास विशेषच महत्त्व आहे. त्यामुळें कमिशन चार्ज अजिबात दूर केला जाण्याचा संभव नाहीं, पण तो १% ऐवजीं ½% म्हणजे सध्यांच्या निम्मा होण्याचा रंग दिसतो.

---

### भारताचा निर्गत व्यापार

भारतानें १९५४ मध्यें ५५७ कोटी रुपये किंमतीची निर्गत केली; १९५४ मधील निर्गत ५३२ कोटी रुपयांची होती.

५५७ कोटी रुपयांच्या निर्गतींत १३१ कोटी रुपयांचा चहा होता, १२१ कोटी रुपयांचा ताग होता व ७२ कोटी रुपयांचें कपास–कापड होतें.

आयातींत अन्नधान्याचा अनुक्रम १९५२ मध्यें पहिला (२८० कोटी रु.) होता, १९५३ मध्यें तिसरा (८१ कोटी रु.) होता, तो १९५४ मध्यें पांचवा (४९ कोटी रु.) झाला. खनिज तेलांचा ८७ कोटी रु.) आयातींत पहिला अनुक्रम लागला. त्यांचे खालोखाल यंत्रसामुग्रीचा अनुक्रम होता.

---

**तिबेटचा आर्थिक विकास**— तिबेटचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी चीनच्या सरकारनें ४·२ कोटी चिनी डॉलर्स मंजूर केले आहेत. ल्हासा येथें एक लोखंडाचा व एक कातड्याचा कारखाना काढण्यांत येणार आहे. तिबेटच्या दळण-वळण खात्याला चीन ७५० मोटार ट्रक्सहि वापरण्यासाठी देणार आहे. तिबेटमध्यें वीज–निर्मितीचीं केंद्रेंहि उघडण्यांत येतील.


स्थापना १९३६

## युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—*पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.*

शाखा–मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी व लोणंद

ता. ३१-१२-५४ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | २,१०,००० |
| ठेवी | रु. | ७८,९७,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ९१,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २–८–० | रु. २–११–० | रु. ३–०–० | रु. ३–८–० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४–०–० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १–८–० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | २–०–० |
| चालू डिपॉझिट | " | ०–८–० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन



## 'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार

२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक

३ व्यापारी उलाढाली

४ सहकार



स्थापना सन १९३५ टे. नं. २४५१८

## दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १

( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | | |
|---|---|---|
| संकलिपत भांडवल | रु. | १,००,००० |
| जमा भांडवल | रु. | ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. | ८०,०००हून अधिक |
| ठेवी | रु. | ६,००,००० " |
| खेळतें भांडवल | रु. | ९,००,००० " |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

श्री. खं. सा. वांडकर, एम्. ए., एलएल. बी., (अध्यक्ष)

श्री. रा. सा. भ. ना. ढोबळे, ( उपाध्यक्ष )

श्री. द. अ. ढोबळे, बी. ए., एम्. एल. ए., जे. पी., ( मॅनेजिंग डायरेक्टर )

श्री. उ. भा. तांबे, श्री. आ. पां. ढोरे,

श्री. म. भा. वामन, श्री. गे. गो. ढोले,

श्री. खं. स. काळे, श्री. गे. ल. नलवडे.

डायरेक्टर्स.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

# अर्थ

बुधवार, ता. २० एप्रिल, १९५५

संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे




## इंपीरिअल बँकेचें राष्ट्रीयीकरण जवळ आलें

### स्टेट बँकेची स्थापना करून तिचेकडे इंपीरिअल बँकेचा कारभार देणारें बिल

रिझर्व्ह बँकेच्या 'कमिटी ऑफ डायरेक्शन ऑन रूरल क्रेडिट'नें (गोरवाला कमिटीनें) शेतीच्या कर्जपुरवठ्याबाबत अत्यंत धाडसाच्या व दूरगामी शिफारसी केल्या, त्यांपैकी महत्त्वाच्या शिफारसींची अंमलबजावणी करण्याचा सरकारचा निश्चय जाहीरहि झाला आहे. इंपीरिअल बँक व राज्य सरकारांचा कमी–अधिक संबंध असलेल्या इतर १० बँका ह्यांचें राष्ट्रीयीकरण करण्याचें सरकारनें ठरविलें आहे. त्यांतून निर्माण होणारी स्टेट बँक ऑफ इंडिया ही सहकारी व इतर बँकांना असंख्य शाखांकरवीं आर्थिक मदत करील. आजच रिझर्व्ह बँकेचे व्यापारी बँकांवर बरेंच प्रभावी नियंत्रण आहे. हिंदी शेड्यूल्ड बँकांकडे जेवढ्या ठेवी आहेत, त्याच्या ४०% ठेवी एकट्या इंपीरिअल बँकेकडे आहेत आणि तिचें राष्ट्रीयीकरण झालें म्हणजे सरकारचें बँकिंग क्षेत्रावरील आक्रमण कितीतरी पटींनें वाढणार आहे.

स्टेट बँक ऑफ इंडिया निर्माण होण्याच्या आधीची पायरी म्हणजे इंपीरिअल बँकेवर सरकारचा प्रभावी ताबा आणणें ही होय. लोकसभेंत दि. १६ रोजीं अर्थमंत्री, श्री. देशमुख, ह्यांनीं त्यासाठीं एक बिल मांडलें आहे. बिलांतील महत्त्वाचा भाग म्हणजे, सरकार जाहीर करील त्या दिवशीं इंपीरिअल बँक चालू स्थितींतच सरकार स्वतःकडे घेईल. त्या दिवशीं इंपीरिअल बँकेचीं सर्व येणीं, देणीं, हितसंबंध, इत्यादि स्टेट बँक ऑफ इंडियाकडे वर्ग होतील. इंपीरिअल बँकेचे सर्व अधिकारी व नोकर त्या दिवसापासून स्टेट बँक ऑफ इंडिआचे अधिकारी व नोकर बनतील; त्यांच्या नोकरीच्या अटी कायम राहतील, पण त्या मागून स्टेट बँक बदलूं शकेल अशी तरतूद केलेली आहे. ठरलेल्या दिवशीं इंपीरिअल बँकेचे शेअर्स रिझर्व्ह बँकेकडे वर्ग झाले, असें समजलें जाईल.

बँकेच्या पूर्ण भरणा झालेल्या शेअरला १७६५ रु. १० आ. ० पै मिळतील व पूर्ण भरणा न झालेल्या शेअरला ४३१ रु. १२ आं. ४ पै दिले जातील. २० डिसेंबर, १९५४ पूर्वीच्या १२ महिन्यांतील शेअरची सरासरी किंमत लक्षांत घेऊन नुकसान–भरपाईची रक्कम ठरविण्यांत आली आहे. ही रक्कम प्रत्यक्ष कोणत्या पद्धतीनें दिली जाईल, हें बिलांत नमूद केलेलें आहे. रिझर्व्ह बँकेचें राष्ट्रीयीकरण करतांना नुकसान–भरपाई देण्याची जी योजना केली होती, त्याचप्रकारची ही योजना राहील.

रिझर्व्ह बँकेच्या नांवें स्टेट बँकेचें भाग–भांडवल इश्यू केलेलें राहील. इंपीरिअल बँकेचे भाग रिझर्व्ह बँक नुकसान–भरपाई देऊन स्वतःकडे घेईल, तेंच हें भाग–भांडवल होय. ह्या भांडवलापैकी ४५% भाग–भांडवल इतरांना देण्याची मोकळीक रिझर्व्ह बँकेला राहील. ५५% भाग–भांडवलाची मालकी नेहमींच रिझर्व्ह बँकेकडे राहील. ४५% भाग–भांडवलाच्या वाटणींत इंपीरिअल बँकेच्या जुन्या भागीदारांना प्राधान्य मिळेल. स्टेट बँकेचें अधिकृत भांडवल २० कोटी रुपये असेल, त्यांपैकी ५,६२,५०,००० रुपयांचें ५,६२,५०० भागांत विभागलेलें भांडवल रिझर्व्ह बँकेला ॲलॉट केलेलें राहील. म्हणजे, इंपीरिअल बँकेच्या आजचा ५०० रुपयांच्या भागाची जागा नवा १०० रुपयांचा भाग घेईल.

स्टेट बँकेची व्यवस्था मध्यवर्ती सरकारनें नेमावयाच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सकडे राहील. बोर्डाची घटना अशी असेलः—१ चेअरमन व १ व्हाइस चेअरमन सेंट्रल बोर्डाच्या सल्ल्यानुसार मध्यवर्ती सरकार नेमील. सेंट्रल बोर्ड मध्यवर्ती सरकारच्या मंजुरीनें २ मॅनेजिंग डायरेक्टर्स नेमील. रिझर्व्ह बँक वगळून बाकीच्या भागीदारांनीं ६ डायरेक्टर निवडावयाचे. रिझर्व्ह बँकेच्या सल्ल्यानुसार सरकारनें ८ डायरेक्टर नेमावयाचे. १ सरकारी अधिकारी, डायरेक्टर म्हणून सरकार नियुक्त करील आणि १ डायरेक्टर रिझर्व्ह बँक नियुक्त करील. इतर बँकिंग कंपन्यांचे भाग धारण करण्यास स्टेट बँकेला प्रतिबंध नाहीं व इतर बँका सबसिडिअरी म्हणून चालविण्यासहि तिला आडकाठी नाहीं. राज्य सरकारांच्या कमी–अधिक संबंध असलेल्या बँका सबसिडिअरी म्हणून तिला घेतां याव्या, ह्यासाठीं तरतूद केलेली आहे.

स्टेट बँक अस्तित्वांत आल्याचें जाहीर होईल, त्या दिवसापासून पांच वर्षांचे आंत तिनें किमान ४०० नव्या शाखा उघडावयाच्या आहेत. इंपीरिअल बँकेच्या आजच्या शाखांत ह्या शाखांची भर पडणार आहे.

---

## पो. सेव्हिंग्ज बँका 'बँकर'च्या व्याख्येंत येणार

निगोशिएबल इन्स्ट्रुमेंटस ॲक्टांत दुरुस्ती करणारें एक बिल लोकसभेंत मांडण्यांत आलें आहे. ॲक्टांतील 'बँकर'ची व्याख्या बदलून, पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकांना निगोशिएबल इन्स्ट्रुमेंटस ॲक्टाच्या कक्षेंत आणणें, हा त्या दुरुस्तीचा उद्देश आहे. रूरल बँकिंग चौकशी कमिटीच्या शिफारसींप्रमाणें, सरकारनें १९५० सालीं एक कमिटी नेमून तिचेकडे पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकांची लोकप्रियता वाढविण्यासाठीं सूचना करण्याचें काम सोंपविलें होतें. कांहीं निवडक पो. सेव्हिंग्ज बँकांत पैसे ठेवणें व काढणें ह्यासाठीं चेकची सोय सुरू करावी, असें ह्या कमिटीनें सुचविलें. ही सूचना सरकारनें मान्य केली व ती आतां अंमलांत आणण्यांत येत आहे.

---

## रूरल क्रेडिट सर्व्हे रिपोर्टास मान्यता

घटक राज्यांच्या सहकारी खात्यांचे सेक्रेटरी व सहकारी पतपेढ्यांचे रजिस्ट्रार, ह्यांची परिषद दिल्ली येथें गेल्या आठवड्यांत भरली होती. गोरवाला कमिटीच्या शिफारशींप्रमाणें, सहकारी संस्थांच्या कार्यांत सरकारचा वाढता हात असावा, ह्या नव्या तत्त्वास मान्यता देण्यांत आली. परिषदेंतील प्रारंभींचें महत्त्वाचें भाषण प्रा. द. गो. कर्वे ह्यांनीं केलें.

## १९५४ मधील आयुर्विम्याचा विक्रम

१९५४ मधील नव्या आयुर्विमा कामाचे जे आंकडे उपलब्ध झाले आहेत, त्यावरून त्या वर्षीतील एकूण नव्या कामाचा आंकडा २५० कोटी रुपयांवर गेला असावा, असा रंग दिसतो. सोबतच्या तक्त्यांत ३० कंपन्यांचे तुलनात्मक आंकडे दिले आहेत. त्यांत एका वर्षांत त्या कंपन्यांनीं केलेल्या प्रगतीची कल्पना येईल; व त्यावरून २५० कोटी रुपयांच्या नव्या कामाचा अंदाज बांधण्यांत आला आहे. १९५० पासूनच्या नव्या कामाचे आंकडे खालीं दिले आहेत, ते उद्बोधक आहेत:—

| वर्ष | नवें काम ( कोटी रु. ) |
|---|---|
| १९५० | १३९·५ |
| १९५१ | १४७·९ |
| १९५२ | १४६·७ |
| १९५३ | १५४·५ |
| १९५४ ( अंदाज ) | २५०·० |

भारतांत ह्यापूर्वी कोणत्याहि एका वर्षी एवढें आयुर्विम्याचें काम पुरें झालेलें नव्हतें व एका वर्षात एवढी वाढहि कधीं अनुभवास आलेली नव्हती.

आयुर्विम्याचें नवें काम
( आकडे कोटी रुपयांचे )

| कंपनी | १९५४ | १९५४ | वाढ % |
|---|---|---|---|
| ओरिएंटल | २३·४२ | ५०·०० | ११३·५ |
| न्यू इंडिया | १९·९१ | ४३·२४ | ११७·३ |
| हिंदुस्तान | १८·८९ | ३०·०० | ५८·८ |
| नॅशनल | १२·०९ | १८·१८ | ५०·४ |
| मेट्रोपॉलिटन | ८·७६ | १०·२५ | १७·० |
| बॉंबे म्युच्युअल | ४·४१ | ६·८२ | ५४·६ |
| भारत | ४·४२ | ६·३५ | ४६·० |
| लक्ष्मी | ३·५२ | ५·६० | ५९·१ |
| युनायटेड इंडिया | ३·८० | ५·३१ | ३९·७ |
| बॉंबे लाईफ | ४·८९ | ५·३० | ८·४ |
| इंड. प्रूडेन्शिअल | ३·०० | ४·५९ | ५३·० |
| न्यू एशिॲटिक | ३·०९ | ४·२५ | ३७·५ |
| वेस्टर्न इंडिया | ३·७६ | ४·०७ | ८·२ |
| एंपायर ऑफ इंडिया | ३·२२ | ३·८२ | १८·६ |
| नॅशनल इंडियन | २·५८ | ३·४४ | ३३·३ |
| रूबी जनरल | २·६४ | ३·४० | २८·८ |
| जनरल ॲशुरन्स | २·२१ | ३·१० | ४०·३ |
| एशिअन | २·०३ | २·६८ | ३२·० |
| आंध्र | १·७२ | २·०० | १६·२ |
| रेल्वे एम्प्लॉइज | १·३८ | १·६० | २३·२ |
| जयभारत | ·८५ | १·४० | ६४·७ |
| पृथ्वी | १·१४ | १·३३ | ११·३ |
| युनिव्हर्सल | ·८२ | १·३३ | ६२·२ |
| इंडियन म्युच्युअल | १·०२ | १·२० | १७·६ |
| कलकत्ता इन्शुरन्स | ·८३ | १·१७ | ४०·९ |
| न्यू ग्रेट | ·७२ | १·१५ | ५९·७ |
| बॉंबे को-ऑपरेटिव्ह | ·८६ | १·१० | २७·८ |
| आर्यस्थान | १·०० | १·०५ | ५·० |
| सनलाइट | ·६८ | १·०० | ४७·० |
| न्यू गार्डिअन | ·५२ | ·९० | ७३·१ |

### श्री. के. पी. जोशी ह्यांचा सत्कार

श्री. के. पां. जोशी, अध्यक्ष, भारत इंडस्ट्रिअल बँक लि., यांना चैत्र शु. १ रोजीं ७० वें वर्ष संपून ७१ वें वर्ष लागलें. तन्निमित्त त्यांचा सत्कारसमारंभ कॉमर्स क्लबतर्फे ता. ४ एप्रिल रोजीं करण्यांत आला. श्री. नी. ना. क्षीरसाक्षर, श्री. रा. बा. साळवेकर, श्री. न. प. केळकर व श्री. सी. व्ही. कुळकर्णी यांचीं श्री. भाऊसाहेब यांच्याबद्दल गुणगौरवात्मक व अभिष्टचिंतनपर भाषणें झालीं.

### डेक्कन बँकर्स् ॲसोसिएशनचे नवे पदाधिकारी

डेक्कन बँकर्स् ॲसोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांची सन १९५५-५६ सालाकरितां ता. ४-४-५५ रोजींच्या सभेंत निवडणूक होऊन श्री. के. पां. जोशी ( भारत इं. बँक ) यांना अध्यक्ष निवडण्यांत आलें. तसेंच श्री. चौधरी ( रत्नाकर बँक ) यांना उपाध्यक्ष, श्री. म. व्यं. शिंगरे, ( भोर स्टेट बँक ) यांना कार्यवाह व खजिनदार म्हणून व श्री. ग. बा. साळवेकर यांना उप-कार्यवाह म्हणून निवडण्यांत आलें.


पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., पुणें शहर

## नोटीस

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेची सहामाही चर्चात्मक सभा शनिवार दि. ३० एप्रिल १९५५ रोजीं सायंकाळीं ५-३० वाजतां बँकेच्या मुख्य कचेरींत भरणार आहे.

तरी सर्व सभासदांनीं सभेस हजर राहावें अशी विनंती आहे.

पुणें शहर ता. १२-४-५५ } मो. वि. रवडे, मॅनेजिंग डायरेक्टर

## NOTICE

**THE PRESIDENCY INDUSTRIAL BANK, LIMITED, POONA.**

Notice is hereby given that the Eighteenth Annual General Meeting of the Share-holders of the Presidency Industrial Bank, Ltd., Poona, will be held on Saturday the 30th April 1955 at the Presidency Bank Building, Poona, at 4 p. m. to transact the following business :—

1. To receive and consider the Profit and Loss Account, the Balance Sheet and the Report of the Directors and Auditors for the year ending 31st December 1954.

*2. To declare a dividend.

3. To elect the Directors in place of the retiring Directors, who being eligible offer themselves for re-election.

4. To appoint Auditor or Auditors and to fix his or their remuneration. The present Auditors, M/s. B. C. Abhyankar and Co. retire and are eligible for re-election and offer themselves for the same.

5. To transact any other business as may be allowed by the Chairman.

Poona City. 16th March 1955. } By order, C. T. Chitale, Managing Director.

* The transfer Books of the Bank will be closed from 25th April to 6th May 1955.

## दि मिरज स्टेट बँक लिमिटेड, मिरज.

### डायरेक्टरांचा २६ वा अहवाल

(१) रिपोर्टाचे सालीं ठेवीवरील दिलेलें व्याज, नोकरवर्गास दिलेला बोनस व इतर खर्च वजा जातां ता. ३१-१२-५४ इ. अखेरचा निव्वळ नफा रुपये ६२,९५३-७-३ होतो. त्यांत मागील सालचा पुढें ओढलेला नफा रुपये २२२-६-० मिळविल्यावर एकूण नफा रुपये ६३,१७५-१३-३ होतो.

| | |
|---|---|
| एकूण नफा ... ... | रु. ६३,१७५-१३-३ |
| यांतून वजा : भागिदारांना ता. ३०-६-५४ रोजीं संपलेल्या सहामाहीकरितां द. द. शें. ४ टक्केप्रमाणें भरलेल्या भांडवलावर करमाफ इंटेरियम डिव्हिडंड दिलें ती रक्कम | रु. १२,०००-०-० |
| | ५१,१७५-१३-३ |

सदर राहिलेले रुपये ५१,१७५-१३-३ या रकमेची वाटणी खालीलप्रमाणें करावी अशी डायरेक्टरांची सूचना आहेः—

| | |
|---|---|
| १ जनरल रिझर्व्ह फंड | रु. ५,१५०- ०-० |
| २ इन्कम टॅक्स करितां तरतूद | रु. १३,०००- ०-० |
| ३ इनव्हेस्टमेंटस् खातीं जमा करणेसाठीं | रु. ६,६००- ०-० |
| ४ बॅड डेट रिझर्व फंड | रु. १,८४५- ५-० |
| ५ डिव्हिडंड तरतूद फंड | रु. २००- ०-० |
| ६ ता. ३१-१२-५४ इ. अखेर संपलेल्या सहामाहीकरितां भागीदारांना भरलेल्या भांडवलावर करमाफ फायनल डिव्हिडंड द. सा. द. शें. ६ टक्केप्रमाणें | रु. १८,०००- ०-० |
| ७ भागीदारांना भरलेल्या भांडवलावर करमाफ सिल्व्हर ज्युबिली बोनस १ टक्क्याप्रमाणें | रु. ६,०००- ०-० |
| ८ पुढील सालचे हिशेबांत ओढणेस | रु. ३८०- ८-३ |
| | ५१,१७५-१३-३ |

(२) वरील सूचनेप्रमाणें रिझर्व फंडांत नफ्यांपैकी रुपये ५,१५०/- मिळविल्यावर रिझर्व फंडाचा आंकडा रु. ६,०६,०००/- (रुपये सहा लक्ष सहा हजार फक्त) म्हणजे तो भरलेल्या भांडवलापेक्षा रु. ६,०००/- अधिक होईल. ही गोष्ट बँकेचें स्थैर्य दाखवितें.

(३) रिपोर्टाचे सालीं बँकेचा व्यवहार समाधानकारक झाला असल्याचें ताळेबंदावरून दिसून येईल.

(४) रिपोर्टाचे सालीं बँक स्थापन होऊन पंचवीस वर्षे पूर्ण झालीं. त्यानिमित्त रौप्यमहोत्सव ता. २२-९-५४ इ. रोजीं साजरा करण्यांत आला. त्या प्रसंगीं रिझर्व बँक ऑफ इंडियाचे एक्झीक्युटिव्ह डायरेक्टर, श्री. जे. व्ही. जोशी ह्यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें होतें. "लहान बँकांचें ग्रामीण विभागांतील कार्यक्षेत्र" या विषयावर त्यांचें विचारपरिप्लुत व मार्गदर्शक असें भाषण झालें.

### संक्षिप्त ताळेबंद

| | | | |
|---|---|---|---|
| भांडवल | ६,००,००० | कॅश व बँकांत | १६,९५,२५० |
| रिझर्व व इतर फंड | ६,३६,९५० | इनव्हेस्टमेंटस | २१,६१,९०२ |
| ठेवी | ४४,००,९५१ | कर्जें | १५,८४,२३० |

## मुंबई राज्यांतील हातमागाचा धंदा

हातमागाचा धंदा हा मुंबई राज्यांतील एक अत्यंत महत्त्वाचा असा घरगुती उद्योगधंदा आहे. अनेक अडीअडचणींना तोंड देऊन हा व्यवसाय टिकून राहिला आहे. दीर्घकालीन मंदीची परिस्थिति थोडी पालटली असून आतां ती कांहींशी अनुकूल झाली आहे. अलिकडेच मुंबई राज्यांत निमदुष्काळी परिस्थिति निर्माण झाल्यामुळें आणि बाजारांत हातमागाच्या कापडाचा खप न झाल्यामुळें या धंद्याची परिस्थिति फार बिकट झाली होती. त्यांतच कापड गिरण्यांच्या स्पर्धेची भर पडली आणि हातमाग-धंद्याची स्थिति फारच हलाखीची झाली. कारण, कापड-गिरण्यां-जवळ भरपूर पैसा असल्यामुळें त्यांना आपला माल दूरदूरच्या खेडेगांवांपर्यंत नेतां येत असे. तथापि भारत सरकार व मुंबई सरकार यांनीं या धंद्यास सढळपणें मदत करण्याचें धोरण स्वीकारलें व परिणामकारक असे उपाय योजले. त्यामुळें १९५४ सालांत या धंद्याच्या पुनरुज्जीवनाचीं चिन्हें दिसूं लागलीं.

### हातमाग व विणकरी यांची आंकडेवारी

स्टेट टेक्स्टाइल कंट्रोलरांनीं १९५१ सालीं घेतलेल्या खानेसुमारीवरून असें दिसून येतें कीं, त्यावेळीं राज्यांत एकूण १,९८,७५२ हातमाग होते व त्यांपैकी १,५२,६२८ माग १ मे, १९४६ पूर्वी आणि ४६,१२४ माग १ मे, १९४६ नंतर नोंदविलेले होते. त्यांची जिल्हानिहाय संख्या पुढीलप्रमाणें होतीः—

| जिल्ह्याचें नांव | मागांची संख्या |
|---|---|
| मुंबई उपनगर | १०,७८४ |
| पुणें | १,९०१ |
| जळगांव (पूर्व खानदेश) | ७,५६९ |
| धुळें (पश्चिम खानदेश) | ३,४६९ |
| ठाणें | ४,६७६ |
| सांगली (दक्षिण सातारा) | २,६५३ |
| रत्नागिरी | १,२९८ |
| विजापूर | ३६,५२६ |
| भडोच | १,१०५ |
| नडियाद (खेडा) | ५,४७९ |
| बडोदें | ८९० |
| मेहसाणा | ७,५८३ |
| अमरेली | १,५७७ |
| हिमतनगर (साबरकांठा) | ८८३ |
| अहमदाबाद | ७,१४३ |
| नाशिक | १३,७८३ |
| पालनपूर (बनासकांठा) | ३,८५९ |
| कारवार | ५३२ |
| बेळगांव | १४,९४५ |
| उत्तर सातारा | २,६१३ |
| सुरत | ८,३७२ |
| गोध्रा (पंचमहाल) | ३८४ |
| धारवाड | २०,९४४ |
| अहमदनगर | ५,७३० |
| कोल्हापूर | ७,५४० |

| | |
|---|---|
| कुलाबा | २१६ |
| सोलापूर | १६,३२३ |

५५,९८३ विणकऱ्यांकडे प्रत्येकीं एक माग आहे, २०,०८३ विणकऱ्यांकडे प्रत्येकीं दोन माग आहेत आणि १६,७४० विणकऱ्यांकडे प्रत्येकीं तीन किंवा चार माग आहेत. विणकऱ्यांकडील बहुतेक माग लाकडांतील धावत्या धोट्याचे ( पिट स्लाय शटल ) आहेत. आपोआप गति देणारी यंत्रसामुग्री जोडलेले असेहि बरेच धावत्या धोट्याचे माग आहेत. तसेंच पॅडलचेहि माग आहेत. मात्र फेकावयाच्या धोट्याचे ( थ्रोशटल ) जातीचे माग फारच थोडे आहेत.

३० जून १९५४ रोजीं राज्यांत एकूण ४८२ विणकर सहकारी संस्था होत्या व त्यांची सभासद-संख्या ६५,२५० इतकी होती, त्यापैकीं ५८,२३० विणकरांचे स्वतःचे माग होते; तर १,६०० मालक ( मास्टर ) विणकर होते आणि ५,४२० सभासद सहानुभूतिदार सभासद होते. या संस्थांचे भरणा झालेलें भांडवल २६.९४ लाख रुपये होते आणि राखीव व इतर निधि ३०.१८ लाख रु. आणि खेळतें भांडवल ८१.१८ लाख रुपये होते. सभासदांना व बिगर सभासदांना पुरविण्यांत आलेला आणि संस्थांनीं उत्पादनासाठी वापरलेला कच्चा माल ३६.५४ लाख रुपये किंमतीचा होता आणि या संस्थांनीं एकूण २३.६० लाख रुपये किंमतीचा तयार माल विकला.

मुंबई सरकारचा इकॉनॉमिक्स अँड स्टॅटिस्टिक्स ब्यूरो सर्व हातमाग केंद्रांची आणि जेथें १० पेक्षा अधिक माग आहेत अशा गांवांची पाहणी करीत आहे. हें पाहणीचें काम लवकरच पुरें होईल आणि थोड्याच दिवसांत त्याचे निष्कर्ष हातीं येतील. या निष्कर्षांमुळें सदरहू धंद्यापुढील प्रश्न समजावून घेण्यास मदत होईल, एवढेंच नव्हे तर धंद्याच्या विकासाच्या योजना आंखण्यासाठीही त्याचें साहाय्य होईल.

## मुंबई राज्यांतील विणकरांच्या सहकारी संस्था

हातमागाच्या धंद्याची सहकारी तत्त्वावर संघटना करून धंद्यापुढील प्रश्न सोडवितां येतील हें मुद्दाम भर देऊन सांगण्याची जरूरी नाहीं. या धंद्यांत सहकारी संघटनेला भरपूर वाव आहे. हा धंदा सहकारी तत्त्वावर संघटित केला जावा अशी राज्य सरकार व भारत सरकार या दोघांचीहि इच्छा आहे.

मुंबई राज्यांत अंदाजें एकूण एक लाख विणकर असून त्यांतील तीन-पंचमांश विणकर सहकारी संस्थांचे सभासद आहेत. येत्या तीन वर्षांत आणखी ३०,००० विणकरांना सहकारी संस्थांचे सभासद करण्याचा विचार आहे. मुंबई राज्यांत विणकऱ्यांच्या सहकारी संस्थांबाबतची गेल्या सहा वर्षांतील परिस्थिति पुढीलप्रमाणें आहे:—

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.
बँकेचे सर्व व्यवहार केले जातात
अधिकृत भांडवल रु. १०,००,०००
वसूल झालेलें भांडवल रु. ७,२९,०००
रिझर्व रु. ६,०५,६००
ठेवी रु. १,९५,००,०००
शाखा:— दादर, माहीम, बेळगांव, पुणें

म्हैसूर राज्यासाठी फिनॅन्स बोर्ड— म्हैसूर-राज्य-सरकारनें उद्योगधंद्यांना साह्य देण्यासाठी आपलें इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन स्थापन करण्याचें ठरविलें आहे. कॉर्पोरेशनचें अधिकृत भांडवल २ कोटि रुपयांचें असेल, व त्यापैकीं १ कोटि रुपयांचें भांडवल विक्रीला काढण्यांत येणार आहे. हें भांडवल रिझर्व्ह बँक शेड्यूल्ड बँक्स राज्यसरकारें इत्यादींकडून खरेदी करण्यांत येईल.

गव्हाच्या किंमती स्थिरावण्याचा प्रश्न—भारतांत ज्या राज्यांत गहूं प्रामुख्यानें पिकतो त्या राज्यांच्या अन्नविषयक सेक्रेटरींची बैठक भारतीय सरकारच्या अन्न व शेतकीखात्यानें बोलाविली आहे. गव्हाचें चालू सालचें पीक हातीं आल्यावर त्यांच्या किंमती जर फार घसरूं लागल्या तर उपाययोजनेची तयारी करण्यासाठी बैठक भरविण्यांत आली आहे.

बिहार सरकारची दिल्लींत इमारत—बिहार सरकारनें दिल्लींत एक इमारत विकत घेतली आहे, असें समजतें. बिहार राज्याचे मंत्री, सरकारी अधिकारी अगर इतर लोक दिल्लींत सरकारी कामासाठीं आल्यास त्यांच्या उतरण्याची सोय व्हावी म्हणून ही घेण्यांत आली आहे.

कलकत्त्यामधील मोटारींची वहातूक—कलकत्ता शहरांतील मोटार-बसेसची वाहतूक येत्या पांच वर्षांच्या काळांत सरकार आपल्या मालकीची करील, अशी माहिती पश्चिम बंगालचे मुख्य मंत्री, डॉ. बी. सी. रॉय, ह्यांनीं राज्याच्या विधिमंडळांत सांगितली. ह्या उपक्रमामुळें मोटारींची वाहतूक करणाऱ्या ३२२ खाजगी मोटार-मालकांवर परिणाम होईल, असेंहि ते म्हणाले.

माजी संस्थानिकांच्या दिल्लींतील इमारती— नव्या दिल्लींत माजी संस्थानिकांच्या मालकीच्या असलेल्या इमारतींपैकीं १३ इमारती भारतीय सरकारनें भाड्यानें घेतल्या आहेत, एक इमारत विकत घेतली आहे आणि पांच वापरण्यासाठीं घेतल्या आहेत, सहा इमारती परदेशीय वकिलातींना अगर आंतरराष्ट्रीय संघटनांना भाड्यानें देण्यांत आल्या आहेत.

| ३० जून रोजीं संपणारें वर्ष | संस्थांची संख्या | सभासदांची संख्या | खरेदी व विक्री रु. | खेळतें भांडवल रु. | नफा रु. | तोटा रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| १९४८-४९ | २६८ | ४२६९१ | ४,४०,९५,७५६ | ८२,५४,१३३ | ४,१२,७५४ | — |
| १९४९-५० | ३५४ | ४७७९४ | १,८१,६८,०१८ | ६१,६४,८२३ | २,४२,४११ | १,७९,३५७ |
| १९५०-५१ | ४७७ | ६१२४६ | ३,५७,७०,०७३ | १,३९,८९,०१० | ६,२०,७२७ | ३८,९१५ |
| १९५१-५२ | ४८२ | ६५०१० | ५,०५,४३,९५४ | १,०८,५०,९११ | ५,६५,७८४ | १,१८,४२७ |
| १९५२-५३ | ४८७ | ६९०९५ | ९९,५६,३९९ | ८४,३०,११४ | ६९,७३६ | ६,१५,५८५ |
| १९५३-५४ | ४८२ | ६५२५० | ५३,१३,८३६ | ८१,१७,९०८ | ६२,८६६ | ४,०५,०७४ |

### इंदूर येथील घड्याळांचा कारखाना

इंदूर येथें घड्याळें तयार करण्याचा कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखान्यासाठी लागणारी यंत्रसामुग्री विकत घेऊन ती उभारण्यासाठी भारतीय सरकारनें १,२३,२५० रुपयांची मदत मंजूर केलेली आहे. कारखान्यांत ग्रामोद्योगाच्या पद्धतीवर घड्याळें तयार करण्यांत येणार आहेत. संपूर्ण घड्याळें तयार करण्याच्या प्रक्रियेपैकी निम्मा-अधिक भाग ग्रामोद्योगासारखा असेल व बाकीचें काम पूर्ण करण्यासाठी एक मध्यवर्ती वर्कशॉप स्थापन करण्यांत येईल. वर्कशॉपमध्यें अर्थातच जरूर त्या प्रकारची यंत्रसामुग्री बसविण्यांत येईल. कारखान्यासाठी योग्य अशी एखादी सरकारी इमारत निवडण्यांत येईल अगर तशी एखादी इमारत भाड्यानें घेण्यांत येईल. वर्कशॉपमध्यें आंदोलकाची व इतर प्रकारचीं घड्याळें तयार करण्यांत येतील; त्याचप्रमाणें घड्याळासाठी लागणारे सुटे भागहि तयार करण्यांत येतील. कारखान्यांत टाइमपीसिस व भिंतीला लावण्याचीं घड्याळेंहि हळुहळु तयार होऊं लागतील. सध्यां मध्यवर्ती वर्कशॉपमधून दर महिन्याला भिंतीला लावण्याचीं १०० घड्याळें तयार करण्याचा इरादा आहे. कांहीं दिवसांनीं अशा घड्याळांचें उत्पादन आणखी वाढविण्यांत येणार आहे. कारखान्याला एकूण भांडवल सुमारें २,३३,४७० रुपये लागेल असा अंदाज करण्यांत आला आहे. त्यापैकी १,२३,२५० रुपयांचा खर्च प्रथम एकदांच करावा लागेल आणि ८०,२२० रुपयांचा खर्च दरसाल करावा लागेल. त्याशिवाय खेळतें भांडवल म्हणून ३०,००० रुपये लागतील. कारखान्याची योजना श्री. कस्तुरे नांवाच्या गृहस्थांनीं तयार केली आहे. तथापि, कारखान्याच्या यंत्रसामुग्रीची मालकी भारतीय सरकारकडे रहाणार असून मध्यभारत सरकारच्या औद्योगिक खात्याचे प्रमुख त्याच्या कारभारावर नियंत्रण ठेवणार आहेत.

### रिझर्व्ह बँककडील ठेवी व गुंतवणूक

( आंकडे कोटी रुपयांचे )

| वर्ष (शेवटचा आठवडा) | ठेवी — सरकारी — मध्यवर्ती | ठेवी — सरकारी — राज्यें | ठेवी — सरकारी — एकूण | ठेवी — बँका | गुंतवणूक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १९३९ | | | १२.९७ | १७.१८ | ६.३१ |
| १९४३ | १३.७८ | १०.४१ | २४.२८ | ९०.१७ | ७.६९ |
| १९४७ | ३४६.०३ | १७.९७ | ३६४.०० | १०८.०७ | ९३.२६ |
| १९४८* | २१४.४९ | १५.५७ | २३०.०६ | ६६.९५ | ९२.२० |
| १९४९ | १५२.०१ | २२.४१ | १७४.४२ | ७५.१२ | ९०.२८ |
| १९५० | १६४.४५ | १४.८२ | १७९.२७ | ५५.३९ | १००.०१ |
| १९५१ | २१०.४९ | १०.१९ | २२०.६८ | ५०.७२ | १०१.१८ |
| १९५२ | १७४.७९ | ३.५५ | १७८.३४ | ४५.०९ | ९९.४५ |
| १९५३ | ११०.२४ | १८.७९ | १२९.०३ | ४५.९९ | ७४.७२ |
| १९५४ मार्च | ६५.७७ | ६२.५९ | १२८.३६ | ४२.४१ | ६६.१६ |
| जून | ११६.४७ | २०.३१ | १३६.७८ | ४५.०५ | ८५.१५ |
| सप्टें. | १४१.२० | १४.४९ | १५५.६९ | ६२.५९ | ९५.४९ |
| डिसें. | ५४.८९ | १६.७४ | ७१.६३ | ६१.१२ | ७५.३४ |

* जुलै, १९४८ नंतर भारताचेबद्दलचे आकडे आहेत.

**भोपाळ राज्यांतील प्राथमिक शिक्षण**— दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत आपल्या राज्यांत सक्तीचें मोफत प्राथमिक शिक्षण सुरू करण्याचें भोपाळ राज्य-सरकारनें ठरविलें आहे. ह्या शिक्षणाच्या योजनेसाठी १ कोटी रुपये खर्च येईल, असा अंदाज आहे. पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या शेवटीं राज्यांत १,००० प्राथमिक शाळा उघडण्यांत आलेल्या असतील.


# सांगली बँक लि.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

मुंबई शाखा — फोर्ट

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | ४½ लक्ष रु. |
| रिझर्वस् व इतर फंडस् | ५¾ लक्ष रु. |
| खेळतें भांडवल | सव्वा कोटीवर |

— व्याजाचे दर —

| | द. सा. द. शें. |
|---|---|
| करंट ... ... | रु. ½ |
| सेव्हिंग ... ... | रु. १½ |
| स्पे. सेव्हिंग ... | रु. २ |
| १ वर्ष मुदत ... | रु. ३ |
| ३ वर्षें मुदत ... | रु. ४ |

कॉल डिपॉझिट स्वीकारतो.

बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.

# दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक

शाखा:—१ संकेश्वर, २ होसूर बेळगांव, ३ गोकाक, ४ जयसिंगपूर, ५ वेंगुर्ला, ६ मालवण, ७ नंदगड, ८ गडहिंग्लज, ९ रामदुर्ग, १० चिकोडी, ११ सौंदत्ती, १२ बेळगांव, १३ नरगुंद, १४ शिरोडा, १५ चिपळूण, १६ कणकवली, १७ निपाणी, १८ बैलहोंगल, १९ मिरज, २० अथणी, २१ देवगड, २२ ठळकवाडी बेळगांव, २३ सावंतवाडी.

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. २,१७,००० |
| ठेवी | रु. ९६,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. १,२०,०,०००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतींत अद्ययावत् पद्धतीचा सेफ डिपॉझिट व्हॉल्ट ता. १०।४।१९५३ पासून सुरू आहे. ता. १।९।५४ पासून सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील लॉकर्सचे दर लोकांचे खास सोयीकरितां कमी केले आहेत. तरी सर्वांनीं व्हॉल्टला एक वेळ भेट देऊन, सवलतीचे दराचा अवश्य फायदा घ्यावा.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.

## जगांतील लोखंडाच्या सांठ्याचा अंदाज

दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस भारताचें पोलादाचें वार्षिक उत्पादन ६० लाख टन असावें, असें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें आहे. ही गोष्ट लक्षांत ठेवता, संयुक्त-राष्ट्रसंघटनेच्या लोखंड-पोलादाच्या सात तज्ज्ञांनीं जगांतील लोखंडाच्या खाणीं-विषयीं केलेला अंदाज बोधप्रद ठरण्यासारखा आहे. ह्याच तज्ज्ञांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं, त्यांनी केलेले पूर्वीचे अंदाज जितके अचूक असावयास हवेत तितके नव्हते. म्हणून प्रत्येक देशांतील लोखंडाच्या खाणींचे अंदाज अधिक बिनचूक करण्यांत यावेत, असें त्यांचें म्हणणें आहे. १९५० सालीं जगांतील लोखंडाच्या मातीचा अंदाज ५,४०,००,००,००,००० टन करण्यांत आला होता. तथापि अगदीं अलीकडील अंदाज त्यापेक्षा बराच अधिक म्हणजे ८,४०,००,००,००,००० टन असा करण्यांत आला आहे. लोखंडाच्या सांठ्याच्या अंदाजांत अशा रीतीनें ५० टक्क्यापेक्षाहि अधिक वाढ झालेली दिसते. ह्यावरून ह्या संबंधींचे आकडे किती अपूर्ण आहेत, तें दिसून येतें. तज्ज्ञांच्या नव्या अंदाजाप्रमाणें आशियांत खाणींतून काढता येण्यासारख्या लोखंडाच्या मातीचा सर्वांत अधिक सांठा आहे. परंतु चालू पिढीच्या हयातींत तरी त्या साठ्याचा उपयोग केला जाण्याची फारशी शक्यता दिसत नाहीं. आशियांत सुमारें २८,००,००,००,००० टन लोखंडाच्या मातीचा सांठा असावा. आशियांतील राष्ट्रें आपली औद्योगिक प्रगति वेगानें घडवून आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. अशा वेळीं ह्या साठ्यापासून इमारतींना अगर पुलांना लागणारें पोलाद निर्माण करतां येईल. आशिया खालोखाल दक्षिण अमेरिकेंत लोखंडाची माती मोठ्या प्रमाणावर आहे. द. अमेरिकेनंतर युरोपचा व त्याच्या मागून उत्तर अमेरिकेचा अनुक्रम लागतो. उत्तर अमेरिकेंतील लोखंडापासून पोलाद बनविण्याचा वेग मात्र खूप आहे. गेल्या वर्षीं १०,००,००,००० टन लोखंडाचें व पोलादाचें उत्पादन तेथें झालें.

**नेपाळमधील सिनेमागृहांवर निर्बंध**—नेपाळचे राजे महेंद्र ह्यांनीं राज्यांतील सिनेमागृहें आठवड्यांतून दोन दिवस बंद ठेवावींत व बाकीच्या दिवशीं फक्त दोन खेळ दाखविण्यांत यावेत, असा हुकूम काढला आहे. भारतामधून फिल्म्स आयात करण्यासाठीं व चित्रगृहें चालविण्यासाठी जें डिझेल तेल आणावें लागतें, त्याला द्याव्या लागणाऱ्या भारतीय चलनांत बचत व्हावी म्हणून हा हुकूम काढण्यांत आल्याचें समजतें.

**पाणीपट्टी न भरल्याचा परिणाम**—पाणीपट्टी न भरल्यामुळें अहमदाबादच्या कॉर्पोरेशनच्या अधिकाऱ्यांनीं १,७७८ घरांचे पाणी पुरवठ्याचे नळ तोडण्याचे हुकूम काढले आहेत. कॉर्पोरेशनचे कमिशनर श्री. राजपाल ह्यांनीं अशी माहिती जाहीर केली आहे की, १ एप्रिल, १९५५ अखेर अहमदाबादच्या नागरिकांकडून निरनिराळ्या खात्याकडील १५ लाख रुपयांची बाकी येणें आहे.

**गोव्याला पाकिस्तानचा तांदूळ**—ब्रह्मदेशाकडून येणारा तांदूळ गोव्यांत येईनासा झाल्यामुळें तेथें तांदुळाची टंचाई भासत आहे. पाकिस्ताननें ह्या अडचणीच्या काळांत गोवा सरकारला तांदुळाचा पुरवठा करण्याचें कबूल केलें आहे, असें समजतें. तांदुळाच्या पुरवठ्याविषयीं पाकिस्तान सरकारशी कायमचा करार करण्याचा गोव्याचें सरकार विचार करीत आहे.

## लोकरीची अनिर्बंध निर्यात

बीवार येथें ऑल इंडिआ वूल ट्रेड फेडरेशनची चौथी परिषद् नुकतीच भरली होती. अध्यक्ष श्री. शिवरतन मोहट्टा आपल्या भाषणांत म्हणाले कीं, भारताजवळ किमान पक्षीं ४·१ कोटी पौंड लोकर गरजेपेक्षा अधिक असते. देशांतील लोकरीच्या धंद्याला कोणत्याहि प्रकारचा धोका उत्पन्न न करता ही वरकड लोकर निर्यात करता येण्यासारखी आहे. सध्या लोकरीच्या निर्यातीवर जीं बंधनें घालण्यांत आलीं आहेत त्यांची जरूरी नाहीं. सध्या कच्च्या लोकरीचें अधिक उत्पादन करण्यास उत्तेजन देण्यांत येत आहे. गालिचे, वगैरेंना उपयोगी पडण्यासारख्या लोकरीचें उत्पादन कमी करून 'मेरिनो' मेंढ्यांच्या लोकरीचें उत्पादन अधिक प्रमाणांत करण्याचे प्रयत्न सध्या सुरू आहेत. पण ह्या बदलामुळें भारताच्या लोकरीच्या धंद्याला धोका उत्पन्न होण्याचा संभव आहे. गालिच्यांना लागणारी लोकर उत्पन्न करण्यांत भारत अग्रेसर आहे. लोकरीच्या उत्पादनाच्या प्रकारांत हल्लीं जो बदल करण्यांत येत आहे, त्यामुळें भारताला आपली एतद्विषयक परकीय बाजारपेठ गमवावी लागणें अपरिहार्य होऊन बसेल. म्हणून, सरकारनें ह्यासंबंधीं सावधानता राखावी हें इष्ट आहे. सध्या लोकरीच्या निर्यातीवर असणारीं बंधनें रद्द करून सरकारनें तिच्या अनिर्बंध निर्यातीला परवानगी द्यावी. परिषदेचें उद्घाटन करतांना कॉंग्रेसचे अध्यक्ष, श्री. यू. एन्. धेबर, म्हणाले कीं, लोकरीच्या धंद्यांतील प्राथमिक स्वरूपाची जोखीम धनगरावरच प्रामुख्यानें पडते. म्हणून प्रथम त्याची परिस्थिती सुधारणें जरूर आहे. परिषदेला यश चिंतणारे संदेश बऱ्याच परदेशीय प्रतिनिधींच्याकडून आले होते. त्यांत ब्रिटनचे व पाकिस्तानचे भारतामधील हायकमिशनर ह्यांचेहि संदेश होते. त्याचप्रमाणें, इंटरनॅशनल वूल सेक्रेटरिएटतर्फेंहि सदिच्छा व्यक्त करण्यांत आली होती.

**अमेरिकेंत हिंदी बोलपट**—भारतीय बोलपट अमेरिकेंत मामुली व्यापारी पद्धतीनें दाखविण्यांत येणार, अशीं चिन्हें दिसत आहेत. १९४७ सालीं अमेरिकेंत 'शकुंतला' हा चित्रपट प्रथमच धंदेवाईक पद्धतीनें दाखविण्यांत आला. आतां 'चंद्रलेखा' ह्या बोलपटाची रंगीत आवृत्ति वॉशिंग्टनमधील एका चित्रगृहांत दाखविण्यांत येणार आहे. हा बोलपट भारतांत यशस्वी झालेला आहे.

**ब्रिटन आणि अणुशक्तीचा उपयोग**—ब्रिटनच्या ॲटॉमिक एनर्जी ॲथारिटी ह्या संस्थेचे सभासद, सर इव्हॅन स्टॅडफोर्ड ह्यांनीं असें सांगितलें कीं अणुशक्तीचा औद्योगिक उपयोग करण्याच्या कामीं ब्रिटन इतर कोणत्याहि राष्ट्रापेक्षा अधिक पुढारलेलें आहे. अणुशक्तीवर वीज उत्पन्न करणारीं १२ केंद्रें बांधण्याचें ब्रिटननें ठरविलें आहे. त्यांपैकी चार १९५९ अगर १९६० अखेर पुरीं होतील व बाकीचीं १९६५ अखेर चालू होतील.

**अंदमानांत फिरता दवाखाना**—अंदमानांतील बेटांत रहाणाऱ्या लोकांना औषधोपचार करण्यासाठीं एक फिरती मोटार लॉंच ठेवण्यांत येणार आहे. लॉंचमध्यें सर्व प्रकारचें वैद्यकीय साहित्य ठेवण्यांत येईल व तज्ज्ञ डॉक्टर्स ठिकठिकाणीं जाऊन लोकांना वैद्यकीय मदत देतील. ही लॉंच कोलंबो-मदत योजनेप्रमाणें अंदमानच्या सरकारला देण्यांत येणार आहे.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनी छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाभिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.